# स्वातंत्र्य चळवळीतील विजयालक्ष्मी पंडित यांचे योगदान

**तेजस दत्तात्रय नरके**
इतिहास विभाग- B.A III
विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर( स्वायत्त)
tejasnarake0909@gmail.com

**घोषवारा :-**

विजयालक्ष्मी पंडित ह्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अतिशय प्रतिभावंत व प्रभावशाली महिला होत्या. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासोबतच त्यांनी गुलामगिरीत असलेल्या भारतीयांच्या राजकारणात देखील महत्त्वपूर्ण भूमिका त्यांनी पार पाडली. विजयालक्ष्मी पंडित या त्यांच्या पिढीतील सर्वात दृश्यमान व सर्वोच्च श्रेणीतील स्त्री होत्या. गांधीजींच्या प्रभावाने विजयालक्ष्मी पंडित यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात स्वतःला झोकून देऊन कार्य केले. विजयालक्ष्मी पंडित या भारतातील प्रख्यात राजकारणी, मुत्सद्दी तसेच स्वातंत्र्यसेनानी होत्या. कारण 1937 ते 1939 या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून स्थानिक प्रशासन चालवणाऱ्या या भारतातल्या पहिल्या महिला राजकारणी ठरल्या. विजयालक्ष्मी पंडित यांनी भारतीय संविधान सभेत देखील काम केले. त्या संविधान सभेत संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी त्या महिला सदस्या होत्या. याच दरम्यान त्यांनी राजकरणातील अनेक पदे देखील सांभाळली. प्रस्तुत शोधनिबंधातून विजयालक्ष्मी पंडित यांनी स्वातंत्र्यासाठी दिलेल्या योगदानाचे विवेचन केले आहे.

**कळीचे मुद्दे :-** प्रतिभावंत, राजकारणी, मुत्सद्दी, स्वातंत्र्यसेनानी, स्थानिक स्वराज्य संस्था...

**प्रस्तावना:-**

विजयालक्ष्मी पंडित यांचा जन्म 18 ऑगस्ट 1900 रोजी उत्तर प्रदेश मधील अलाहाबाद येथे एका सदन कुटुंबात झाला. पंडित मोतीलाल नेहरू यांच्या त्या कन्या होत्या. तसेच पंडित जवाहरलाल नेहरूंची विजयालक्ष्मी पंडित या बहीण होत्या. विजयालक्ष्मी पंडित यांच्या आईचे नाव स्वरूपराणी असे होते. विजयालक्ष्मी पंडित यांचे लग्ना पूर्वीचे नाव स्वरूप कुमारी असे होते. रणजीत सिताराम पंडित यांच्याशी विवाह झाल्यानंतर परंपरेनुसार नाव बदलून विजयालक्ष्मी असे ठेवण्यात आले व त्यानंतर त्यांना विजयालक्ष्मी पंडित या नावाने ओळखले जाऊ लागले. विजयालक्ष्मी पंडित यांचे प्राथमिक शिक्षण घरीच अध्यापिकेद्वारे झाले व नंतरचे शिक्षण स्वित्झर्लंड मध्ये झाले.

**विजयालक्ष्मी पंडित यांच्यावर गांधीजींचा प्रभाव :-**

विवाहपूर्वीच विजयालक्ष्मीचा गांधीजींशी संपर्क आला होता. विजयालक्ष्मी पंडित यांनी गांधीजींना 9 नोव्हेंबर 1920 मध्ये जवळून पाहिले. कारण महात्मा गांधीजी त्यावेळी मोतीलाल नेहरू यांचे निवासस्थान आनंद भवन येथे आले होते, त्यानंतर गांधीजींच्या सल्ल्यानुसार विजयालक्ष्मींना काही दिवसासाठी साबरमती आश्रममध्ये राहण्यासाठी पाठवले गेले. तसेच यापुढे गांधींच्या सहमतीनेच विजयालक्ष्मीचा विवाह श्री रणजीत पंडित यांच्याशी झाला. विजयालक्ष्मी पंडित यांच्यावर गांधीजींचा मोठा प्रभाव होता कारण गांधीजींची त्यावेळची भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीची आंदोलने त्यांनी पाहिली होती. गांधीजींच्या प्रेरणेनेच विजयालक्ष्मी पंडित यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. व त्यानंतर विजयालक्ष्मी पंडित या प्रत्येक आंदोलनात सहभागी असायच्या.

**विजयालक्ष्मी पंडित यांचे स्वातंत्र्यासाठी योगदान :-**

विजयालक्ष्मी पंडित यांनी गांधीजींच्या प्रेरणेने स्वतंत्र्यलढ्यात सहभाग घेतला. विजयालक्ष्मी पंडित या स्वातंत्र्यसेनानी होत्या. त्यांनी मुक्ती लढ्यात भाग घेतल्यावर त्यांना अनेक वेळा तुरुंगवास देखील भोगावा लागला. 1932 मध्ये त्यांना तुरुंगवासाची शिक्षा झाली. गांधींच्या 'छोडो भारत' चळवळीत देखील विजयालक्ष्मी पंडित यांनी सहभाग घेतला. त्यांनी भारतीय स्वातंत्र लढ्यात भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी खूप संघर्ष केला व त्यांनी इंग्लंडला भारतातून गेले पाहिजे असे भाषणात बोलल्या इंग्लंडच्या वृत्तपत्रात त्यांचे भाषण प्रकाशित झाले. विजयालक्ष्मी पंडित या उत्तम वक्त्या असल्याने त्यांचे भाषण देखील परखड असायचे. विजयालक्ष्मी पंडित व त्यांच्या सहकाऱ्यांनी भारत व इतर देशातील सार्वजनिक सभेमध्ये उपस्थिती दर्शवून विजयालक्ष्मीनीं भाषण दिले. तसेच रेडिओ व वृत्तपत्राद्वारे त्यांनी आपले विचार मांडले. त्यांच्या मते, भारताचे प्रतिनिधीत्व हे स्वतंत्र भारतातील लोकच करू शकतात. विजयालक्ष्मी पंडित यांचे व्यक्तिमत्व तेजस्वी होते. त्यांच्या वेगवेगळया या गुणांमुळेच त्यांच्या वेगवेगळ्या कार्यक्षेत्रातील कार्यशैलीमुळे त्या प्रसिद्ध झाल्या.

त्यांनी सामाजिक आणि आर्थिक सुधारणा, मानवी हक्कांचे बळकटीकरण आणि महिलांचे सक्षमीकरण यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. व त्यांनी वैयक्तिक आयुष्यापेक्षा स्वातंत्र्यलढ्यात व राजकारणात जास्त वेळ खर्ची घातला. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातही त्यांची भूमिका महत्त्वाची ठरली. ब्रिटिश राजवटीत त्यांनी मंत्रिमंडळात सदस्य म्हणून कार्यभार सांभाळला.

- त्याचबरोबर विजयालक्ष्मी पंडित ख्यातनाम इंग्रजी लेखिका होत्या. इंग्रजी भाषेत त्यांनी
  1. So, I became a minister.
  2. Prison Days.
  3. The scope of happiness इत्यादी त्यांनी ग्रंथ लिहिले.

**विजयालक्ष्मी पंडित -विधानसभा सदस्य :-**

विजयालक्ष्मी पंडित यांचा जन्म राजकीय कुटुंबातच झाला असल्याने त्यांना राजकारणात रस होता. 1937 च्या झालेल्या निवडणुकीत उत्तर प्रदेश विधानसभेत त्या निवडून आल्या. विजयालक्ष्मी पंडित या भारताच्या पहिल्या महिला मंत्री ठरल्या तसेच भारतातील कॅबिनेट पदावर नियुक्ती झालेल्या या पहिल्या महिला होत्या.

**विजयालक्ष्मी पंडित -भारताचे राजदूत व पहिली महिला मंत्री :-**

1946 मध्ये राज्य मंत्रिमंडळात मंत्री म्हणून विजयालक्ष्मी पंडित यांची नियुक्ती झाली. विजयालक्ष्मी पंडित यांनी युनायटेड स्टेट्स, रशिया, मेक्सिको, आयर्लंड आणि स्पेन इत्यादी देशात भारताचे राजदूत म्हणून काम केले. विजयालक्ष्मी पंडित या 1947 मध्ये स्वतंत्र भारतातील पहिल्या महिला राजदूत बनल्या. व त्यांनी आपल्या हुशारीने कार्यभार सांभाळला. व भारतातच नव्हे तर जगात देखील आपल्या कार्याचा ठसा उमठवला. बहुमोल व विशेष कामगिरी केली.

विजयालक्ष्मी पंडित यांनी स्वातंत्र्यानंतर 'युनायटेड नेशन्स'मध्ये भारताच्या प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व केले आणि युनियनच्या महासभेच्या पहिल्या महिला अध्यक्ष झाल्या.

1952-1964 मध्ये त्या लोकसभेवर निवडून आल्या व काही काळ त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या राज्यपाल म्हणून कार्यभार सांभाळला. संविधानातून संसदेसाठी निवडणुकीसाठी उभे राहण्यासाठी त्यांना आपल्या पदाचा राजीनामा दिला. भारत तसेच परदेशात देखील त्यांची प्रतिष्ठा आणि राजकीय अनुभव आणि मुत्सद्दी यामुळेच त्यांनी आपली वेगळी प्रतिमा निर्माण केली.

**स्वातंत्र्यानंतर विजयालक्ष्मी पंडित यांनी भूषवलेली पदे :-**

1) 1949-52 - अमेरिका व मेक्सिकोत भारताच्या राजदूत.
2) 1953-54 - युनोच्या महासभा या शाखेच्या अध्यक्षा.
3) 1953-54 - युनोच्या साधारण सभेच्या अध्यक्षा.
4) 1954-64 - ब्रिटनमध्ये उच्चायुक्त त्याचबरोबर स्पेन व आयर्लंडच्या राजदूत.
5) 1962-64 - महाराष्ट्राच्या राज्यपाल

**महिलांसाठी काम :-**

विजयालक्ष्मी पंडित यांच्या पतीचा मृत्यु झाला होता पण कायद्यात संपत्तीचा वाटा देण्याची तरतूद नव्हती व त्यांना मुलगाही नव्हता तीनही मुलीच होत्या. त्यामुळे त्यानंतर त्यांच्या पतीच्या भावाकडेच ही संपत्ती गेली. यानंतर विजयालक्ष्मी पंडित यांनी भारतीय स्त्रीला न्याय मिळवून देण्याचा निश्चय केला. विजयालक्ष्मी पंडित यांनी स्त्रियांना त्यांचा अधिकार मिळवून देण्यासाठी खूप प्रयत्न केले. विजयालक्ष्मी पंडित यांनी महिलांच्या हक्कासाठी अनेक प्रयत्न करून लढा दिला आणि स्वतःच्या कष्टातून स्वातंत्र्यानंतर महिलांना त्यांच्या पतिचा वारसा आणि वडिलांची मालमत्ता मिळाली.

**निष्कर्ष:-**

वरील मुद्द्यांच्या आधारे आपल्याला कळून येते की विजयालक्ष्मी पंडित यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी बरेचसे योगदान दिले आहे. कारण त्यांचा आंदोलने तसेच चळवळीत असलेला सहभाग हा मोलाचा ठरला. त्या एक स्वातंत्र्यसेनानी होत्या. विजयालक्ष्मी पंडित यांचा मृत्यू 1 डिसेंबर 1990 रोजी झाला. विजयालक्ष्मीनी राजकारणातील विविध पदे सांभाळत स्त्री म्हणून आपले कर्तृत्व बजावले. प्रस्तुत शोध निबंधातून त्यांच्या कार्याच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्याचा छोटासा प्रयत्न संशोधकाने केला आहे.

**संदर्भग्रंथ सूची :-**

1. Rehana Ghadially (2007), *Urban Women in Contemporary India,* Sage Publication, First Edition, New Delhi.
2. डॉ. बी. आर. बारड (२०१६), भारत के महान क्रांतिकारी, रावत प्रकाशन, दिल्ली.
3. करकरे कुमुद (१९७८), स्त्रीमुक्ती चळवळ, समाजवादी महिला सभा, पुणे.
4. प्रा. कोंडेकर ए. वाय. (१९८७), भारतीय समाजाचा परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर